आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये श्री वेंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

सांगली येथील वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने पार पडलेल्या क्वेस्ट -2k24 या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये इचलकरंजी येथील श्री वेंकटेश महाविद्यालयाच्या बी.बी.ए. व बी.कॉम. आयटी. मधील विद्यार्थ्यांनी बिझनेस प्लॅन, स्वदेशी फॉर यू, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट आणि वर्डिक्ट अशा विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश प्राप्त करत 'जनरल चॅम्पियनशिप' ला गवसणी घालून आपले वर्चस्व कायम ठेवलेले आहे. बिझनेस प्लॅन स्पर्धेमध्ये कु.स्नेहा विष्णू पारिख, स्वदेशी फॉर यु स्पर्धेमध्ये कु. ऐश्वर्या मदन रणदिवे, कु.अमृता महादेव रजपूत, कु.प्रतिक्षा संजय कोळी, कु.ऋषिकेश महेश तुरंबेकर, कु.पार्थ महेश कुंभार, कु.स्नेहा विष्णु पारीख, कु.स्नेहल दीपक पाटील, कु.ज्ञानेश्वरी बाळकृष्ण माळी, कु.अंजली नवलकिशोर झंवर, कु.सृष्टी मोहन मगदूम, कु.अपूर्वा अभयकुमार पाटील स्पर्धकांनी यश प्राप्त केले, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धेमधील उप-विजेते स्पर्धक कु.संजना सुनील पाटील, कु.मैथिली राजाभाऊ शिंदे, वर्डिक्ट स्पर्धेमधील उप-विजेते स्पर्धक कु.रोमा राजेंद्र चव्हाण, कु.हर्षिता संदीप चौगुले सदर विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल श्री वेंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. बी.बी.ए. विभाग प्रमुख पी. पी. दाइंगडे मॅडम बी.कॉम. आयटी. विभाग प्रमुख एस. एम.वंजिरे सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले सदर स्पर्धेसाठी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. विजेत्या सर्व विद्यार्थ्यांना बी.बी.ए. व तसेच बी.कॉम. आयटी. मधील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले व त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल गौरवांवित करण्यात आले.

